# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा

बी. एड. शिक्षणक्रम (P80) अभ्यासकेंद्र प्रमुख / समन्वयक उद्बोधन कार्यशाळा, दि. १८ डिसेंबर २०२४


दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत बी.एड. शिक्षणक्रम (P80) अभ्यासकेंद्र प्रमुख / समन्वयक कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदर कार्यशाळेसाठी अभ्यासकेंद्राचे व विद्यापीठातील खालीलप्रमाणे प्रतिनिधी सहभागी होते.

**विद्यापीठातील प्रतिनिधी**

१) प्रा. संजीवनी महाले (संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा) विभाग)
२) प्रा. प्रकाश देशमुख (संचालक, विद्यार्थी सेवा विभाग)
३) प्रा. प्रविण घोडेस्वार (प्रवर्तन समन्वयक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा)
४) प्रा. सज्जन थूल (संचालक, मूल्यमापन विभाग)
५) प्रा. विजयकुमार पाईकराव (सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा)
६) डॉ. दयाराम पवार (सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा)
७) डॉ. सुभाष सोनुने (सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा)
८) श्री. मनोज घंटे (प्रमुख, नोंदणी कक्ष)
९) श्री. गणेश चव्हाण ( प्रमुख पुस्तक भांडार)

**बी.एड. कार्यशाळेसाठी एकूण १५ अभ्यासकेंद्रांवरील प्रतिनिधी उपस्थित होते, त्यांची यादी परिशिष्ट – १ मध्ये दिलेली आहे.**

बी. एड. कार्यशाळेची कार्यवाही पुढीलप्रमाणे करण्यात आली.



**१. नोंदणी :-**

बी. एड. कार्यशाळेस उपस्थित सर्व सहभागींचे अभ्यासकेंद्र संचालक / समन्वयकांची प्रथम नोंदणी करून घेण्यात आली.


**२) प्रास्ताविक व उद्बोधन उद्दिष्टे :-**

कार्यशाळेच्या प्रथम सत्रात डॉ. सुभाष सोनुने यांनी सर्व उपस्थित अभ्यासकेंद्र प्रमुख व समन्वयकांचे स्वागत केले, परस्पर ओळख करून घेतली व कार्यशाळेचा उद्देश सांगितला. विद्याशाखेच्या संचालक, प्रा. संजिवनी महाले यांनी सदर कार्यशाळेचे प्रास्ताविक केले. तसेच बी.एड. तुकडी २०२४-२६ प्रवेशासंदर्भात UGC/DEB ने विद्यापीठाला बी.एड. प्रवेशाबाबत उशिरा मान्यता दिली व १५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत प्रवेश पूर्ण करण्यात यावे असे आदेशित केले असल्यामुळे, बी.एड्. शिक्षणक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२६ तुकडीची प्रवेश प्रक्रिया उशिरा सुरु झाली व १५ नोव्हेंबर

२०२४ पर्यंत संपली. त्यामुळे काही अभ्यासकेंद्रांवर प्रवेश कमी झालेले आहे. यानंतर २०२४-२६ तुकडीची प्रवेश प्रक्रिया होणार नाही, असे संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांनी उपस्थित अभ्यासकेंद्राना यासंदर्भात सांगितले.

३) **बी.एड. शिक्षणक्रम संरचना व संपर्कसत्रे व प्रात्यक्षिक माहिती :-**

कार्यशाळेच्या द्वितीय सत्रात डॉ. सुभाष सोनुने यांनी बी.एड. शिक्षणक्रम संरचना व संपर्कसत्र व प्रात्यक्षिक याबाबत माहिती दिली.




**४) अध्ययन साहित्य परिचय :-**

कार्यशाळेच्या तिस-या सत्रात बी.एड. शिक्षणक्रम अध्ययन साहित्याचा परिचय व अध्ययन साहित्यांबद्दल मार्गदर्शन डॉ. दयाराम पवार यांनी करून दिला. त्यामध्ये त्यांनी वैकल्पिक व अनिवार्य विषयांची ओळख करून दिली. शिक्षणक्रमांचे अध्ययन साहित्य हे विद्यापीठात मुख्यालयातून विभागीय केंद्रांना पुरविण्यात येते व विभागीय केंद्रांवरून अभ्यासकेंद्रावर पाठविले जातात. त्यानंतर अध्ययन साहित्य विद्यार्थ्यांना देण्यात येते. बी. एड. अभ्यासक्रमाचे अनिवार्य व वैकल्पिक विषयांची पुस्तके ही विद्यार्थ्यांना अभ्यासकेंद्रामार्फत ह्यावर्षी देण्यात येणार आहे. तसेच प्रात्यक्षिक कार्याबाबतच्या पुस्तिक व संदर्भ कार्यपुस्तिका ह्या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Soft Copy मध्ये उपलब्ध आहेत. त्याबाबत सर्व अध्ययनार्थींना अवगत करून द्यावे. असे आवाहन त्यांनी केले.

**५) बी.एड. मूल्यमापन माहिती :-**

कार्यशाळेच्या चौथ्या संपर्क सत्रात प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी बी. एड. शिक्षणक्रम मूल्यमापनाबाबत अध्ययनार्थी अतंर्गत कार्य मूल्यमापनाबाबत सविस्तर माहिती अभ्यासकेंद्र प्रतिनिधींना दिली.



**६) प्राश्निक परीक्षक समीक्षक माहिती :-**

दुपारनंतर सुरू झालेल्या पहिल्या सत्रात व कार्यशाळेच्या पाचव्या सत्रात मूल्यमापन विभागाचे संचालक, डॉ. सज्जन थूल यांनी बी.एड. शिक्षणक्रमाच्या प्रश्नपत्रिकेच्या स्वरूपाची माहिती दिली. तसेच प्राश्निक, परीक्षक, समीक्षक यांच्या कार्याबाबत सविस्तर सादरीकरण केले. शिवाय प्रत्येक अभ्यासकेंद्राने आपल्या केंद्रावर कार्यरत असलेल्या संमंत्रकांनी नावे परीक्षा विषयक कार्यासाठी परीक्षा विभागाला पाठवावे, तसेच विद्यापीठामार्फत आयोजित परीक्षा विषयक कार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले.


**७) प्रथम वर्ष समंत्रण सत्रातील (दिवाळी सत्रातील) बदल :-**

दुपारनंतरच्या सत्रात प्रा. संजीवनी महाले संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांनी शैक्षणिक वर्षे २०२४-२५ बी. एड.

प्रथम वर्षाच्या संपर्क सत्र आयोजनाबाबत माहिती दिली. त्यात त्यांनी १२ दिवसांचे संपर्क सत्र हे ७ दिवसात घेण्याबाबत मार्गदर्शन केले. आवश्यकतेनुसार दिवसाच्या ८ तासिका घ्याव्यात व १२ दिवसाचे संपर्क सत्र हे ७ दिवसात घ्यावे.

**७ दिवसीय संपर्कसत्र वेळापत्रकातील तासिका व कमी झालेल्या तासिका खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | समंत्रण सत्र | १२ दिवसीय संपर्कसत्रातील मूळ तासिका | २०२४-२६ तुकडीसाठी अपेक्षित तासिका | कृतीनिहाय कमी झालेल्या तासिका |
|---|---|---|---|---|
| १ | स्वागत कृतिसत्र उद्धघाटन | ०१ | ०१ | ०० |
| २ | अभ्यासक्रम विगंहामवलोकन प्रात्यक्षिक कार्य व समंत्रण तासिका | १७ | ०७ | १० |
| ३ | सूक्ष्म अध्यापन तात्विक माहिती | ०१ | ०१ | ०० |
| ४ | अप्रगत कोशल्ये निदान व कौशल्ये निश्चिती कृतिसत्र | ०३ | ०३ | ०० |
| ५ | कौशल्य तात्विक माहिती व पाठनियोजन विषयक माहीती (प्रत्येक कौशल्याला ०१ तासिका) | १० | ०५ | ०५ |
| ६ | सूक्ष्म अध्यापन कौशल्ये (०५ कौशल्ये, प्रत्येकी कौशल्ये ३ तासिका) | ३० | Teach १५ | Re-teach १५ |
| ७ | कौशल्य दिग्दर्शन तासिका | ०५ | ०५ | ०० |
| ८ | मानसशास्त्रीय प्रयोग तासिका | ०३ | ०३ | ०० |
| ९ | ग्रंथालय वापर तासिका | ०२ | ०२ | ०० |
| १० | एकूण तासिका | ७२ | ४२ | ३० |
| अध्यापकांनी अध्ययनार्थीकडून Re-Teach चे सुधारित पाठटाचण तयार करून घ्यावे. | | | | |



६०% संपर्क सत्र हे ऑफलाईन पध्दतीने व ४०% संपर्क सत्र हे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात यावे. ऑफलाईन सत्रात प्रात्यक्षिक कार्य व सूक्ष्म अध्यापन कार्य घेण्यात यावे, तर ऑनलाईन सत्रात विविध अभ्यासक्रमाचे समंत्रण कार्य करण्यात यावे. तसेच विंहगामवलोकन तसेच पुनरावलोकन तासिका ह्या Face to face पध्दतीने घेण्यात याव्या व त्यानंतरचे दुसरे २४ दिवसाचे संपर्क सत्र हे नेहमीच्या संपर्कसत्राच्या वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात यावे, त्यात कोणताही बदल नाही. ऑनलाईन व ऑफलाईन संपर्क सत्राचे अभ्यासकेंद्रावर रेकॉर्ड ठेवण्यात यावे. तसेच सदरील ७ दिवसाचे समंत्रण सत्र हे फक्त तुकडी २०२४-२६ साठीच आहे. आदी प्रकारचे मार्गदर्शन त्यांनी आपल्या मार्गदर्शनात केले.

**८) मूल्यशिक्षण अभ्यासक्रम माहिती :-**

दुपार सत्रातील तिसरे व कार्यशाळेतील सातवे व्याख्यान हे मूल्यशिक्षण या अभ्यासक्रमाच्या अभ्यासकेंद्रावरील कार्यवाही बाबत घेण्यात आले. बहाई अकादमीचे प्रतिनिधी श्री. पराग तांदळे व डॉ. शशी गायकवाड यांनी त्याबाबत माहिती दिली. मूल्यशिक्षण अभ्यासक्रमाबाबत बहाई अकादमी यांच्याशी विद्यापीठाने MOU केलेला असल्याने, बी.

एड. शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी सदरील अभ्यासक्रमाची निवड केलेल्या अध्ययनार्थींना रू. ६१०/- अधिकचे बहाई अकादमीला भरावे लागतात. तसेच ज्या अभ्यासकेंद्राचे मूल्यशिक्षण अभ्यासक्रमाच्या पुस्तकांचे शुल्क मिळाले त्या अभ्यासकेंद्राचे अध्ययन साहित्य हे पाठविल्याचे त्यांनी अभ्यासकेंद्रानां सांगितले. तसेच मूल्यशिक्षण अभ्यासक्रम कार्यवाहीबाबत अभ्यासकेंद्रांना काही अडचणी असल्यास त्यांना बहाई अकादमी मार्फत मार्गदर्शन करण्यात येईल असे सांगितले. अध्ययनार्थीसाठी व्याख्यान घेता येईल का? अशी विचारना अभ्यासकेंद्राच्या प्रतिनिधींनी बहाई अकादमीच्या प्रतिनिधींना केली असता, त्यावर बहाई अकादमीच्या वतीने सहकार्य असेल असे त्यांनी सांगितले.

**९) विद्यापीठातील विविध विभागाची माहिती :**



दुपार सत्रातील चौथे व कार्यशाळेचे आठवे सत्र हे विद्यापीठातील विविध विभागाच्या कार्याच्या ओळखी संदर्भात होते. त्यात विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक, डॉ. प्रकाश देशमुख, नोंदणी कक्षाचे प्रमुख, श्री. मनोज घंटे व पुस्तक भांडार कक्षाचे प्रमुख, श्री. गणेश चव्हाण हे उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या संबंधित विभागाची माहिती अभ्यासकेंद्रांना दिली.

**१०) अभ्यासकेंद्र प्रश्न व अहवाल :-**

डॉ. प्रकाश देशमुख सर, यांनी अभ्यासकेंद्राकडून विद्यापीठाच्या किमान अपेक्षा व्यक्त केल्या, त्यात अभ्यासकेंद्र नामफलक असावा, ग्रंथालय, वर्गव्यवस्था चांगली, पाणी व पार्किग सुविधा असावी असे सांगितले.

अभ्यासकेंद्राचे विविध प्रश्न व शंकाचे समाधान करण्यासाठी शेवटचे सत्र आयोजित केले होते. त्यात अभ्यासकेंद्रानी शिक्षणक्रमाच्या कार्यवाहीबाबत विविध प्रश्न विचारण्यात आले, **त्यात खालील स्वरूपाचे प्रश्न होते.**

**१) अभ्यासकेंद्रावर बी.एड. प्रथम वर्षाचे अध्ययन साहित्य कधी पर्यंत प्राप्त होतील.**

**उत्तर :** पुस्तक भांडार विभागाचे प्रमुख, श्री. गणेश चव्हाण यांनी सर्व अभ्यासकेंद्रांना ३० डिसेबंर २०२४ पर्यंत पुस्तके मिळतील असे सांगितले.

**२) विद्यापीठाकडून कोणत्या तुकडीचा अभ्यासकेंद्र मानधन हिस्सा पाठविला आहे, हे कळत नाही.**

**उत्तर :** विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक, डॉ. प्रकाश देशमुख यांनी सांगितले आम्ही तसे वित्त विभागाला कळवून सुधारणा करण्यासाठी व तसे स्टेटमेंट अभ्यासकेंद्रांना देण्याबाबत सांगण्यात येईल.

**३) बी.एड. च्या सर्व अभ्यासकेंद्रांना अभ्यासकेंद्र मान्यतेचे पत्र देण्यात यावे.**

**उत्तर :** विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक, डॉ. प्रकाश देशमुख यांनी अभ्यासकेंद्रांनी पुनर्रमान्यतेसाठी विद्यापीठाच्या सॉफ्टवेअर मार्फत अर्ज करावा व फी भरावी त्यानंतर अभ्यासकेंद्र मान्यता पत्र विद्यापीठाकडून देण्यात येईल, याबाबत मा. कुलगुरूंचे मार्गदर्शन घेण्यात येईल.

**४) बी. एड. अभ्यासकेंद्रावर कार्य करणाऱ्या सर्व समंत्रकांना विद्यापीठाकडून मान्यता देण्यात यावी.**

**उत्तर :** विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक, डॉ. प्रकाश देशमुख यांनी अभ्यासकेंद्रांनी समंत्रक मान्यतेचे प्रस्ताव पाठविल्यास समंत्रक मान्यता देण्यात येईल असे सांगितले.

५) **बी. एड. अभ्यासकेंद्राला किमान दोन बी.एड. शिक्षणक्रमाचे अध्ययन संच उपलब्ध करून देण्यात यावे.**

**उत्तर :** पुस्तक भांडार विभागाचे प्रमुख, श्री. गणेश चव्हाण यांनी सर्व अभ्यासकेंद्रांना पूढील वर्षापासून बी.एड. शिक्षणक्रमाचे किमान २ अध्ययन संच उपलब्ध करून देऊ असे सांगितले.

६) **नवीन मानधन तक्ता मिळावा.**

**उत्तर :** नवीन मानधन तक्ता विकसन झाल्यावर अभ्यासकेंद्राला लवकरच पाठविण्यात येईल.

७) **ऑनलाइन पद्धतीने बी.एड्. स्वाध्याय सादर करण्याबाबत.**

**उत्तर :** शैक्षणिक वर्षे २०२४-२५ साठी स्वाध्याय प्रश्नांचे उत्तर ऑनलाईन पध्दतीने सादर करावे लागणार नाही असे संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांनी सांगितले.

८) **अभ्यासकेंद्र खर्च प्रमाणपत्राबाबत.**

**उत्तर :** अभ्यासकेंद्राने खर्च केल्याचे UTILISE CERTIFICATE / AUDIT REPORT दरवर्षी सादर करावा.

**NCTE- PAR Report माहिती बाबत खालील चर्चा करण्यात आली.**

अनेक अभ्यासकेंद्रानी अभ्यासकेंद्रावर कार्यरत समंत्रकांची माहिती PAR रिपोर्टमध्ये भरण्यासाठी विद्यापीठाला दिली नाही.

**चर्चा :** आम्हाला आमच्या बी.एड. कॉलेजच्या प्राध्यापकांची माहिती देखील NCTE ला भरावी लागते. त्यांची माहिती मुक्त विद्यापीठाकडून भरल्यास ती डबल होते. माहिती डबल झाल्यामुळे NCTE कडून कार्यवाही होऊ शकते. प्राध्यापकांच्या मनात अशी शंका असल्याने त्यांनी कागदपत्रे विद्यापीठाला पाठविण्यासाठी दिली नाही. असे अभ्यासकेंद्र प्रमुख व प्रतिनिधींनी सांगितले.

१) PAR Report भरण्यासाठी विद्यापीठाने अभ्यासकेंद्रावरील व्यक्तींची Payment Sleep मागितली आहे. आम्हाला विद्यापीठ Payment देत नाही, मानधन देते मग Payment Sleep कशी देणार.

२) PAN CARD /ADHAR CARD / BANK DETAILS विद्यापीठाला का द्यावे?

३) आमच्या अभ्यासकेंद्रावर मनुष्यबळ उपलब्ध नाही, कोठून माहिती देणार

४) शासकिय अध्यापक महाविद्यालयांच्या प्राध्यापकांच्या सारख्या बदल्या होत असतात, मग नेमकी माहिती कोणती द्यावयाची.

५) मागील वर्षाची माहिती अभ्यासकेंद्रावर उपलब्ध नाही.

६) अभ्यासकेंद्रावर कार्यरत प्राध्यापकांची दहावी पासून पुढील सर्व कागदपत्रे कशासाठी द्यावयाची.

वरील अभ्यासकेंद्रासोबत झालेल्या चर्चेच्या संदर्भातील काही प्रश्न हे मा. कुलगुरू सरांशी चर्चा करून, तर काही प्रश्न हे विद्याशाखा परिषदेत मान्य झाल्यानंतर त्यांची उत्तरे कळविण्यात येईल, असे संचालक,

शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांनी अभ्यासकेंद्र बैठकीत अभ्यासकेंद्र संचालक / समन्वयक यांना सांगितले. त्यांनतर सर्व सहभागी अभ्यासकेंद्र प्रतिनिधींचे आभार डॉ. सुभाष सोनुने यांनी व्यक्त केले, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

डॉ. सुभाष सोनुने
बी.एड. शिक्षणक्रम समन्वयक,

**मार्फत,**

प्रा. संजीवनी महाले
संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

शिक्षणशास्त्र विद्याशाखा ★ य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक ★

परिशिष्ट :- १

बी.एड. कार्यशाळेसाठी १५ अभ्यासकेंद्रांवरील उपस्थित प्रतिनिधींची यादी.

| अ. क्र. | संकेतांक | अभ्यासकेंद्र नाव | उपस्थित व्यक्तीचे नाव | दूरध्वनी क्रमांक व ईमेल आयडी |
|---|---|---|---|---|
| १ | 1121A अकोला | शासकीय अध्यापक महाविद्यालय रामदास पेठ, अकोला दु.नं. (०७२४) २४३३७६५ | प्रा. डॉ. विशाल शिवाजी इंगळे | vishalingle28@gmail.cm 9922280289 |
| | | | प्रा.डॉ.निलिमा रामदास शेरेकर | linimasherekar@gmail.com 9420707854/9420707854 |
| २ | 1302A बुलढाणा | शासकीय अध्यापक महाविद्यालय, चिखली रोड बुलढाणा - ४४३ ००१ दु.नं. (०७२६२) २४४३४२ | प्रा.डॉ.नुतन भानुगास चव्हाण | nbcbed@gmail.com 8888486322 |
| ३ | 1504A वाशीम | छबुताई डहाके शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कारंजा (लाड), जि. वाशीम दु.नं. (०७२५६) २२३६१२ | श्री. गोपाल उदयसिंह पवार | gopalpawar5367@gmail.com 9552932267 |
| | | | श्री. अभिजित प्रकाश सावालकर | |
| ४ | 2101A छ. संभाजी नगर | शासकीय अध्यापक महाविद्यालय, स्टेशन रोड, छ.संभाजी नगर दु.नं. (०२४०) २३३४८४० | डॉ. गौतम मुरलिधर गायकवाड | gmgurubed22870@gmail.com.com 9765334433 |
| | | | सिंकात सुभाषराव चंदनशिव | chandanshivsiddhant@gmail.com 8806446770 |
| | | | डॉ. उर्जित जनार्धन करवंदे | urjitsir@gmail.com 9850691948 |
| ५ | 2203A बीड | शासकिय अध्यापक महाविद्यालय अंबाजोगाई जि. बीड- ४३१२०४ | प्रा.राम भानुदास काटकर | ramkatkar681@gmail.com 9657924414 |
| ६ | 3102A चेंबूर मुंबई | चेंबूर सर्वकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय, राधाकृष्ण चेंबूर मार्गसमोर, चेंबूर नाका चेंबूर, मुंबई ४०००७१ (सबअर्बन) दु.नं.(०२२) २५२२१४३९ | डॉ.मंजुळा भंडारी | Bhandari.manjula@gmail.com 9930748189 |
| ७ | 31139 धोबीतलाव मुंबई | सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज ऑफ एज्युकेशन ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव मेट्रो सिनेमा, मुंबई – ४००००१ दु.न. (०२२) २२६२००५० | प्रा.सुनिल अर्जन सोनवणे | sunilsonawane369999@gmail.com 9987089507 |
| ८ | 3213A रायगड | शासकीय अध्यापक महाविद्यालय, पुणे-मुंबई हायवे, पनवेल, जि. रायगड – ४१० २०६दु.नं. : (०२२) २७४५३००० | डॉ.कुसुम विजयकुमार चोधरी | kusumvc@gmail.com 9820166022 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | 37012 पालघर | दीप कॅम्पस, बोईसर ए.जी. एस. कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड), साईधाम परिसराच्या मागे, सरावली, बोईसर, जि. पालघर, पिन कोड - ४०१५०४ | प्रा.मंजुषा देवानंद शेजारे | saijaremanju@gmail.com 9637196632 |
| | | | प्रा. रामदयाल उग्रनाथ यादव | sir.ramdayal@gmail.com 8888748487 |
| १० | 4484A नागपूर | राधिका अध्यापक महाविद्यालय, नवोदय विद्यालय बिल्डिंग, राजीवनगरसोमलवाडा, नागपूर – ४४० ०२५ | प्रा.अमित वसंतराव देवोतळे | amitdeotale2010@gmail.com 9552521272 |
| ११ | 5116A अहमदनगर | विद्या प्रतिष्ठानचे कॉलेज ऑफ एज्युकेशन, केडगावदेवी रोड अहमदनगर – ४१४ ००१ दु.नं. : (०२४१) २५५१४२० | प्रा.विलास देवराव पांढरे | vilaspandhare1315@gmail.com 8308514981 |
| १२ | 5310A जळगाव | खान्देश एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ एज्युकेशन, एम.जे. कॉलेजपरिसर जळगाव – ४२५ ००१दु.क्र. : (०२५७)२२३४१८७ | डॉ. स्वाती वंसतराव चव्हाण | svchavan@kces.in 9823564970 |
| १३ | 7254A सांगली | सांगली शिक्षण संस्थेचे एस.पी.एस. कॉलेज ऑफ एज्युकेशन, राजवाडा, सांगली – ४१६ ४१६ दु.नं. : (०२३३) २३७३८४८ | प्रा. दयानंद बळिराम बोंदर | dayanandbondar@gmail.com 9423326205 |
| १४ | 8416A लातूर | वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय, शिरूर ताजबंद, ता. अहमदपूर, जि. लातूर दु.नं. : (०२३८१) २२०२९० | प्रा.यादव मलप्पा करडीले | yadavkardile137@gmail.com 9922048201 |
| | | | प्रा. पांडूरंग विठ्ठलराव गाटचेरले | gatcherlep.1974@gmail.com 9823216831 |
| १५ | 8702A परभणी | शासकीय अध्यापक महाविद्यालय, जिंतूर रोड, परभणी दु.नं. : (०२४५२)२२४००१५ | डॉ. सुलभा बापुसाहेब मुळे | sulbhagd@gmail.com 9405592922 |

२) अभ्यासकेंद्र प्रमुख /समन्वयक बैठक वेळापत्रक :

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा

बी.एड. अभ्यासकेंद्र संचालक, समन्वयक बैठक व समंत्रक उद्बोधन

दिनांक १८ डिसेंबर २०२४

### उद्बोधन सत्र उद्दिष्टे

१. बी.एड. अभ्यासकेंद्राने केलेले नवोपक्रम व प्रश्न जाणून घेणे.

२. बी.एड. संरचनेची माहिती देणे.

३. बी.एड. संरचनेनुसार संपर्कसत्रे प्रात्यक्षिक आणि मूल्यमापन प्रक्रियेची माहिती देणे.

४. अध्ययन साहित्याची माहिती देणे.

५. अभ्यासकेंद्रावर बी.एड. शिक्षणक्रम कार्यवाहीत येणाऱ्या प्रश्नांवर चर्चा करून उपाय शोधणे.

### कार्यक्रम पत्रिका

| अ.क्र | वेळ | विषय | मार्गदर्शक तज्ज्ञ/व्यक्ती |
|---|---|---|---|
| १ | १० ते १०.३० | नोंदणी व चहा नाश्ता | श्री. प्रदीप शिंदे |
| २ | १०.३० ते ११.१५ | प्रास्ताविक व उद्बोधन उद्दिष्टे | संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा<br>संचालक, विद्यार्थी सेवा विभाग |
| ३ | ११.१५ते १२.४५ | बी.एड. शिक्षणक्रम संरचना व संपर्कसत्र व प्रात्यक्षिक माहिती | डॉ. सुभाष सोनुने |
| ४ | १२.४५ ते १.०० | अध्ययन साहित्य परिचय | डॉ. दयाराम पवार |
| ५ | १.०० ते १.३० | बी.एड. मूल्यमापन माहिती | प्रा. विजयकुमार पाईकराव |
| १.३० ते २.०० फर्तव्य भोजन | | | |
| ६ | २.०० ते २.३० | प्राश्निक परीक्षक समीक्षक माहिती | प्रा. सज्जन थूल |
| ७ | २.३० ते ३.१५ | प्रथम वर्ष हिवाळी सत्र बदल | प्रा. संजीवनी महाले |
|  | ३.१५ ते ४.०० | मूल्यशिक्षण अभ्यासक्रम माहिती | वहाडे अकादमी |
| ८ | ४.०० ते ४.३० | अभ्यासकेंद्र प्रश्न व अहवाल | संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा<br>संचालक, विद्यार्थी सेवा विभाग |
| ९ | ४.३० ते ५.०० | विद्यापीठातील विविध विभागाची माहिती | विद्यार्थी सेवा विभाग, भांडार कक्ष, परीक्षा विभाग |
| १० | ५.०० ते ५.३० | शंका समाधान व समारोप |  |

संचालक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

३) तज्ज्ञ मार्गदर्शक प्रमाणपत्र नमुना:

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक - ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : • www.ycmou.ac.in • https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_edu@ycmou.digitaluniversity.ac   दूरध्वनी Telephone : (0253) 2231472

शिक्षणशास्त्र विद्याशाखा / School of Education

जा.क्र. : शिशावि/ २०२४/२४१    दिनांक : २४.१२.२०२४

शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड.) शिक्षणक्रम (P80) उद्बोधन कार्यशाळा

## प्रमाणपत्र

शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत बी.एड. (P80) या शिक्षणक्रमाची शैक्षणिक वर्ष २०२४-२६ या तुकडीची अभ्यासकेंद्र प्रमुख / समन्वयक कार्यशाळा दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. या कार्यशाळेसाठी ____________यांनी ________________ या विषयावर तज्ज्ञ म्हणून मार्गदर्शन केले, करीता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

समन्वयक,
बी.एड. शिक्षणक्रम

**प्रा. संजीवनी महाले**
संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

४) सहभागीचे प्रमाणपत्र नमुना :

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक - ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_edu@ycmou.digitaluniversity.ac   दूरध्वनी Telephone : (0253) 2231472

शिक्षणशास्त्र विद्याशाखा / School of Education

जा.क्र. : शिशावि/ २०२४/२३७ दिनांक : १८.१२.२०२४

शिक्षणशास्त्र पदवी बी.एड. शिक्षणक्रम (P80) उद्बोधन कार्यशाळा

## उपस्थिती प्रमाणपत्र

शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत कार्यान्वित असलेल्या बी.एड. (P80) या शिक्षणक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२६ च्या तुकडीसाठीची अभ्यासकेंद्र प्रमुख / समन्वयक कार्यशाळा दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी शिक्षणशास्त्र विद्याशाखेने आयोजित केली होती. प्रा./डॉ.----------------------------------------------------------------------- यांनी ------------------------------- या अभ्यासकेंद्राचे प्रतिनिधी म्हणून सदर कार्यशाळेसाठी उपस्थित राहून, आपले शैक्षणिक योगदान दिले, म्हणून आपणास हे उपस्थिती प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

समन्वयक,
बी.एड. शिक्षणक्रम

प्रा. संजीवनी महाले
संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा